REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# सामाजिक विषमतेच्या दृष्टीने भारताची सामाजिक स्थिती

**प्रा. डॉ. डि. एस. आठवले**
**सहा. प्राध्यापाक, राज्यशास्त्र विभाग ,**
**श्रीमती कोकीळाबाई गावंडे महिला महा., दर्यापूर.**

**प्रस्तावना :-**



भारताच्या विविध भागात सामाजिक विषमतेच्या चातुर्वर्ण्य पद्धती, वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था ह्या बाबी ठळकपणे दृष्टीस पडतात. वैदिक वाङ्मयातील अस्पृश्यतेच्या समावेशाबद्दल विविध विद्वानांमध्ये मतैक्य दिसून येत नाही. परंतु मनुस्मृतीतील पुरूषसुक्तामध्ये वर्णव्यवस्थेची मांडणी झाल्याचे दिसते. आर्यांचे इराण व इतर देशामधून झालेले आगमन वैदिक काळ, सिंध काळ, मौर्य काळ, बौद्ध धर्म, गुप्त काळातील सर्व संहितातून भारताच्या सामाजिक विषमतेची रूपे दिसतात् जातिव्यवस्थेमधून अस्पृश्यतेच्या पार्श्वभूमीवर भारतात त्यांना कोणी बृहिष्कृत समजले, कोणी अस्पृश्य, परिया किंवा शुद्र व अतिशुद्र तर कोणी त्यांना अत्यंज, अवर्ण अथवा नामशुद्र तसेच दास, दस्यु, गुलाम या नावाने संबोधित असत. हे सर्व लोक त्यांचे स्वधर्मियच होते. परंतु त्यांचा स्पर्शच काय सावलीचासुद्धा विटाळ मानण्यात येईल. त्यांचे शब्द जरी कानावर पडले तर ते अशुभ मानले जाई. मंदिर प्रवेशा बंदी, सार्वजनिक पाणवठे, विहिरी, स्पृश्यांची वस्ती, देवदर्शन, यज्ञ, सण, मिरवणूका, मुलांना शाळेत प्रवेशास बंदी अशी जातीभेदाची वस्तुस्थिती हिंदुमध्ये होती. उच्चनिचतेच्या प्रवेशास बंदी अशी जातीभेदाची वस्तुस्थिती हिंदुमध्ये होती. उच्चनिचतेच्या शिडीच्या खालच्या स्तरावरील व्यक्तींना वरच्या स्थानावर पोहचण्यासाठी कडक निर्बंध लादते.

"या अस्पृश्यांची वस्ती खेड्याच्या किंवा गाववेशीबाहेर कशीबशी उभी असायची, पोटभर अन्न नाही, वितभर अंगावर कपडा नाही, स्पृश्यांच्या घरी राब-राब राबणे त्याचा मोबदला अत्यल्प, स्पृश्य ठरविल तो मोबदला तेही कधी वस्तूच्या स्वरूपात तर कधी अन्नधान्याच्या स्वरूपात भिकेसारखा दिल्या जात असे. हातात काळी, खांद्यावर घोंगळे (फाटके), कंबरेस लंगोटी असा अस्पृश्य समाजातील पुरूषांचा वेश असे." त्यांचा आहार ठरविण्याचा म्हणजे अन्नात लोणी व गुळ घेण्यावर पूर्णपणे निर्बंध.

त्यांचा असा हा जीवनपट अनेकविध वैशिष्ट्यांनी निर्दनिय बंधनांनी घट्टा बांधून ठेवला होता. कंगाल परिस्थितीस अस्पृश्यांना कसेबसे जीवन जगावे लागत असे. आपल्याच स्वधर्मियांची अशी ही व्यवस्था हिंदूंनी आपल्या वैयक्तिक स्वार्थापोटी केल्याचे दिसते. हजारो वर्ष भारतीय हिंदू समाजावर लागलेला कलंक आजही अनिष्ट सामाजिक रचनेची ओळख दर्शविते.

पाश्चिमात्य देशामधेही अशा प्रकारची म्हणजे गुलामाची पद्धती होती. परंतु त्याला त्यांनी धर्माचे स्थान, वर्गाचे स्थान कधीही दिले नाही. परंतु भारतात गुलामाला धर्माशी जोडल्यामुळे तो कलंक कायम राहिला. अस्पृश्य समाजावर धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक बंधनामुळे हा समाज माणुसकीला पारखा झाला होता. त्यांची अवस्था दयनीय व भयावह झाली होती. हिंदू समाजाचा एक भाग असल्यावर सुद्धा त्यांना निकृष्ट, खालच्या स्तराचे जीवन जगावे लागते.

अशा या द्वेषमुलक पद्धतीला पहिला प्रतिबंध भारतात ब्रिटीशांचे साम्राज्य स्थापित झाले तेव्हापासून झाला. पुढे भारतात राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, गोपालकृष्ण वलंगकर, शिवराम जानबा कांबळे इत्यादींनी कार्य केले. अस्पृश्यांच्या दास्यविमोचनाच्या लढ्यातील डॉ. बाबासाहेबा आंबेडकरांचा सहभाग कोल्हापूर संस्थानातील मानगाव येथे २० मार्च, १९२० मध्ये झालेल्या अस्पृश्यांच्या परिषदेत दिसून येतो. २१-२२ मार्च, १९२० मध्ये झालेल्या महाराष्ट्रातील अस्पृश्यांच्या दयनीय परिस्थितीचा आढावा घेतला आणि अस्पृश्यवर्गांनी राजकीय सत्ता हस्तगत करण्याची आवश्यकता प्रतिपादन करून

जातिनिहाय प्रतिनिधीत्वाच्या मार्गानेच शक्य होईल, असे मत व्यक्त केले. इथून अस्पृश्य वर्गाच्या जागृतीची मुहूर्तमेढ रोवल्या गेली, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

या सर्व सामाजिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर भारताची सामाजिक व राजकीय पार्श्वभूमीचे अध्ययन करणे क्रमप्राप्त ठरते.

भारताच्या सामाजिक व राजकीय व्यवस्थेचे अध्ययन करीत असतांना ही बाब प्रकर्षाने जाणवते की, वेद, उपनिषद, मनुस्मृती, पाषाणकाळ, सिंधू घाटी, वैदिक कालीन भारत, मगधकालीन भारत या कालखंडापासूनच सामाजिक विषमतेचे बीजारोपण भारतीय सामाजिक व राजकीय व्यवस्थेत झालेले दिसून येते. त्यामुळे या सर्व कालखंडाचा संक्षिप्त आढावा अध्ययनाच्या माध्यमातून घेणे आवश्यक ठरते.

## आर्यांचे आगमन :-

"वैदिक आर्य ख्रिस्तपूर्व १४०० च्या सुमारास भारतात राहत होते." वैदिक वाङ्‌मयातच एका नव्या संस्कृतीच्या उदयाची लक्षणे दिसून येतात् युरो-भारतीय आर्यांची टोळी हिंदूकुश पर्वतापर्यंत आली. हेच पर्शुभारतीय आर्य होते. ते पार्शी व वैदिक आर्यांचे पूर्वज होते. त्यानंतर या सर्व टोळयांचे विघटन झाले. त्यापैकी एक टोळी भारतात तर दुसरी टोळी इराणमध्ये आली. जी टोळी भारतात आर्य व आदिवासी यांच्यामध्ये युद्ध होऊन त्यामध्ये स्थानिक भारतीय आदिवासींचा पराभव झाला. या आदिवासींनाच पुढे 'दास्य' किंवा 'दास' या नावाने संबोधले गेले. प्रश्न हा पडतो की, दस्यू किंवा दास याच शब्दांनी त्यांना म्हणावे तर "आर्य या शब्दाचा तिरस्कार किंवा शिवी म्हणून वापर करीत असत." दास हे कृष्ण वर्णाचे, बसक्या नाकाचे, विलक्षण भाषा बोलणारे व अधार्मिक होते. आर्यांच्या देवतांबद्दल, यज्ञविषयाबद्दल त्यांच्या संस्कृतीबद्दल दासांना जराही आदर नव्हता म्हणून आर्यांनी त्यांना गुलाम बनवून पराजीत करून दास बनविले.

## वर्णव्यवस्था :-

आर्यांच्या काळात जी वर्णव्यवस्था अस्तित्वात होती. ती समुहाच्या विशिष्ट कार्यावरून पडल्याचे दिसून येते् आर्यांची जी समाजरचना होती त्यांना 'वर्ण' असे म्हणत. आर्यांच्या ज्या गटामध्ये लढावू वृत्तीचे लोक असत त्यांना 'क्षत्र' म्हणून संबोधले जाई. पौरोहित्य करणारे 'ब्रह्मण' म्हणून ओळखले जाई. व्यावसायिक गटाला 'विश' म्हणत. रोटी-बेटी व्यवहार या त्रैवर्णिक संरचनेत नेहमी होत असत. परंतत गौरवर्णी आर्यांनी कृष्णवर्णीय दासांना पराभूत केलेले असल्यामुळे त्यांना आपले दास बनवून गुलाम म्हणून समाजात स्थान दिले व त्यांनी त्रैवर्णिक लोकांची सेवा करावी हा एकच पर्याय त्यांना देण्यात आला. त्यांनाच मग नंतर 'शुद्र' "वेदकालीन ऋग्वेदाच्या पुरुषसुक्तात या चार्तुवर्ण्य पद्धतीचा स्पष्ट उल्लेख आढळून येतो."

## वैदिक वाङ्‌मय :-

प्राचीन भारताची सामाजिक व धार्मिक स्थितीची स्पष्ट व बोचणारी स्थिती वेदांइतकी इतर कोणत्याही वाङ्‌मयातून आपल्याला दिसून येत नाही. त्यामध्ये भारतीय पूर्वजांची माहिती, हिंदू धर्माचे स्फूर्तीस्थान, श्रद्धास्थान, उगमस्थान व हिंदूंनी तयार केलेली समाजरचना ह्या सर्व बाबींचा स्पष्ट उल्लेख वेद या वाङ्‌मयात दिसून येतो. या वेदांमध्ये चार प्रकारचे ग्रंथ आहेत.

१) संहिता २) ब्राह्मणे २) आरण्यके व ४) उपनिषदे

संहितेमध्ये - १) ऋग्वेद २) यर्जुवेद ३) सामवेद ४) अथर्ववेद

ब्राह्मणेमध्ये - वैदिक मंत्राचा अर्थ लावणे, यज्ञविधी देवीदेवतांच्या कथा यांचा समावेश होतो.

आरण्यके व उपनिषदांमध्ये - प्राणीमात्रांचा जन्म, मरण, विश्वाची निर्मिती व भारतीय समाजाचे, तत्वज्ञानाचे उगमस्थान दृष्टीस पडते.

## संहिता (ऋग्वेद) :-

'ऋग्वेद' हा वेदकालीन वाङ्‌मयातील व संहिता या ग्रंथातील पहिला प्रकार होय. 'ऋग्वेद संहिता' हा वैदिक वाङ्‌मयातील प्राचीन भाग आहे. यामध्ये एकूणा १०२८ सुक्ते असून ती दहा मंडळात विभागलेले आहेत व यामध्ये एकूण १०५५२ ऋचा आहेत.

ऋग्वेदातीलच दहाच्या मंडळात नव्वदावी ऋचा आहे व ती पुरुषसुक्त या नावाने प्रसिद्ध आहे. या पुरुषसुक्तातच चार्तुवर्ण्यपद्धतीचा विचार व वर्णपद्धतीचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे.

पुरुषसुक्तात पुरुषासंबंधी संपूर्ण माहिती महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. याचमध्ये जगाची निर्मितीसंबंधी माहिती दिलेली आहे. पुरुषसुक्तात जेवढे श्लोक आहेत. त्यामधील ११ वा १२ श्लोक वेगळ्या प्रकारचे महत्त्व राखून आहेत. "कारण याच श्लोकामधून चार्तुवर्ण्यपद्धतीचा प्रारंभ झाल्याचे दिसते." या श्लोकामध्ये म्हटले आहे की, विश्वजनकापासून १) ब्राह्मण किंवा पुरोहित २) क्षत्रिय किंवा योद्धे ३) वैश्य किंवा व्यापारी ४) शुद्र किंवा नोकर हे चार वर्ग याची विस्तृत व सखोल माहिती देणारे ११ वे १२ वे श्लोक आहेत.

"पुरुषसुक्तात सांगितलेले हे जे चार वर्ग/वर्ण आहेत त्याची निर्मिती परमेश्वरानेच केली आहे व परमेश्वराचीच तशी अंतिम इच्छा होती व त्यानुसारच मग समाजाची घटना तयार करण्यात आली. या पुरुषसुक्तात ज्या समाजाची रचना उधृत केली आहे. त्यावरून हे स्पष्ट होते

की, या काळात ती चार्तुवर्ण्य व्यवस्था होती. या चार्तुवर्ण्य व्यवस्थेचा पुरस्कार अनेक समाजनियमकांनी केला आहे. त्यासंबंधी 'आपस्तंभ धर्मसुत्र' म्हटले आहे की, 'ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र अशा चार जाती आहेत.' यामध्ये प्रत्येक येणाऱ्या पहिल्या जातीनंतर दुसरी जपत ही कनिष्ट मानल्या जाईल. यामधील शुद्र ही जात सोडून उरलेल्या सर्व जातींना आणि ज्यांनी वाईट कृत्ये केली असतील अशा ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या लोकांना वगळून बाकीच्या सर्व जातीतील लोकांना १) उपनयन २) वेदाभ्यास ३) यज्ञकर्म याबद्दल अधिकार राहणार होते. ह्या सर्व बाबी विशिष्ट धर्मसुत्रात सांगितल्या आहेत."

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र अशा चार जाती (वर्ण) आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या जातींना द्विज म्हणतात. वेदांमध्ये सांगितलेले आहे की, ब्राह्मण हे त्यांचे मुख होता. क्षत्रिय त्यांचे बाहू होता. वैश्य त्याच्या मांड्या होत्या व शुद्र त्यांच्या पायापासून उत्पन्न झाला होता. हिंदू समाजव्यवस्थेचा जनक मानल्या जाणाऱ्या मनुने पुरुषसुक्तात ज्या काही समाजरचनेच्या चार्तुवर्ण्यसंबंधी बाबी सांगितल्या त्या परमेश्वराच्या इच्छेनुसारच आहेत हे समाजमनावर बिंबविण्याचा आटोकाट प्रयत्न मनुने चालविला होता.

**वेदकाळ (सामाजिक जीवन) :-**

मॅक्स मुल्लरच्या मते, वेदांचा काळ इ.स.पू. १२०० ते इ.स.पू. १००० च्या दरम्यान असावा. "वैदिक वाङ्मयातील ऋग्वेद, ऋग्वेदोत्तरामधून वेदकाळातील आर्यांच्या सामाजिक जीवनाची चार्तुवर्ण्यपद्धतीची, स्त्रियांची, कुटुंबसंस्थेची, शिक्षणपद्धतीची माहिती मिळते."

**चातुवर्ण्यपद्धती :-**

"समाजात स्थिरता, संबंध कायम राहावेत यासाठी प्राचीन भारतात म्हणजे वेदकाळात जी संस्था स्थापन करण्यात आली. उच्च-निचतेचा जो प्रकार सुरू करण्यात येऊन आर्यांनी आपले श्रेष्ठत्व टिकविण्यासाठी ज्या माध्यमांद्वारे आटोकाट प्रयत्न केला तो म्हणजे 'चातुवर्ण्यपद्धती' होय." प्राचीन भारतीयांचे ते एक व्यवस्था मांडण्याचे लक्षण समजले जाते. वर्ण या शब्दात 'व' म्हणजे निवडणे होय. व्यक्तीने निवडलेल्या व्यवसायावरून त्याचा वर्ण निश्चित केला गेला. त्यांच्या गुणानुसार समाजाच्या कार्यांची वाटणी केली, अशी पृष्टी वेदवाङ्मयात आढळून येते व हिच वर्णव्यवस्थेच्या मुळाशी असलेली संकल्पना भगवद्‌गितेतही मांडली असल्याचे दिसते.

**ब्राह्मण युग :-**

जन्मावर आधारित त्याचा वर्ण निश्चित केल्या जाऊ लागला. अशी ही चातुवर्ण्यव्यवस्था ब्राह्मणयुगात अधिकच घट्ट करण्यात आली. मंत्रतंत्र जाणणारा, यज्ञ करणारा, पूजा-अर्चा करणारा, दान-धर्म करणारा, ब्राह्मण वर्ग या काळात मोठ्या प्रमाणात फोफावला होता. "या युगात चारही वर्णांचे आचार-विचार, कर्तव्ये-अधिकार, त्यांचेवरील निर्बंध व नियंत्रण तयार केले गेले होते." याच काळात आर्य-मुलनिवासी भारतीय आदिवासी ज्यांना आपण अनार्य म्हणतो त्यांच्यात नेहमी लढाया होत असत म्हणून ब्राह्मणांनी योद्धांचा गट तयार केला. क्षत्रिय वर्ण समाजाची भौतिक संपत्तीचे जतन करून ऐहिक जीवन जगण्यासाठी वैश्य व व्यापारी वर्ग तयार केला. अशा या त्रैवर्णिक वर्गात रोटी-बेटी व्यवहार नियमित होत असत. त्यांच्यात कोणत्याही प्रकारचा दुरावा नव्हता, परंतु अनार्यांकरिता चातुवर्ण्यव्यवस्था अधिक कठीण बनविल्या गेली होती. वरिल तिन्ही वर्णांची सेवा करावी हाच धर्म त्यांचा ठरविला गेला. शुद्रांना सर्वात नीच स्थान दिल्या गेले होते.

सुरूवातीच्या काळात जीत आर्यांनी इथल्या मूलनिवासी भारतीयांचा पराभव केल्यामुळे त्यांना दास बनविले. ज्यांनीा आर्यांच्या संस्कृतीचा, देवीदेवतांचा, नियमांचा, आचार-विचारांचा निमुटपणे स्विकार केला त्यांना वरील तिनही वर्णांत सामावून घेतले गेले व ज्यांनी ह्या सर्व बाबींना प्रखर विरोध केला त्यांना शुद्र ठरवून त्यांनी त्रैवर्णिकांची सेवा करावी हा एकच पर्याय त्यांच्यासमोर ठेवला गेला. "ज्यांनी सेवा करणे नाकारले त्यांचे उपनयन करण्याचे ब्राह्मणांनी नाकारले म्हणून त्यांना शुद्र ठरविल्या गेले."

त्रैवर्णिक यौन संबंधामुळे संकर प्रजा निर्माण झाली. त्रैवर्णिकांच्या संबंधातून निर्माण होणाऱ्या संततीला सुयोग्य समजल्या जाई. परंतु त्रैवर्णिक व शुद्राच्या संबंधातून निर्माण होणाऱ्या संततीला अयोग्य, निषाद व चांडाळ समजल्या जाई.

वर्णव्यवस्थेत त्रैवर्णिकांना अध्ययन, यज्ञ, दान करण्याचा अधिकार होता. पुरोहित स्वतःला त्याकाळी भुदेव समजत होते. त्यांचा दर्जा सर्वांपेक्षा वरचा/श्रेष्ठ ठरविल होता. परंतु शुद्रांना मात्र वेदाभ्या, यज्ञ, दान करणे यासाठी सक्त मनाई करण्यात आली होती. वेदाभ्यासाचा प्रयत्न केल्यास त्यास ठार मारावे. शुद्राने तपश्चर्या करू नये, त्यांनी इतरांचे टाकलेले कपडे घालावे व जोड व अन्न त्यावरच शुद्रांनी आपली उपजीविका करावी असे अधोरेखित केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शुद्र पूर्वी मुळचे सुर्यवंशीय होते व त्यांचा क्षत्रियांमध्ये समावेश होता, असे प्रतिपादन केले आहे.

**प्राचीन सामाजिक व्यवस्था :-**

सामाजिक विषमतेमुळे भारतीय समाजाचे पतन झाले. प्राचीन चातुवर्ण्य व्यवस्था, वर्णव्यवस्था जन्मावर आधारित ठरविल्या गेली. त्यांच्या कार्यावरूना नाही. त्रैवर्णिक लोकांना अध्यापन, अध्ययन, यज्ञ यासंबंधीचे अधिकार देण्यात आले होते. परंतत 'दास' यांना मात्र या तीनही वर्गाची सेवा करावी हाच नियम, पर्याय देण्यात आला होता. कर्मावरून त्यांची गणना होत नव्हती. 'जो ज्या धर्मात किवा वर्गात जन्माला

आला त्यावरच त्याला ओळखल्या जाई.' मूलनिवासी भारतीय आदिवासींना आर्यांनी युद्धात पराभूत करून त्यांना आपले दास बनविले. नंतर त्यांनाच वर्ण व्यवस्थेतील सर्वात निम्न स्थानी, कनिष्ठ स्थानी 'शुद्र' अशा वर्गात विभागजन केले. त्यांना कोणत्याही प्रकारचे विशेष असे अधिकार देण्यात आले नव्हते. म्हणजे प्राचीन काळापासूनच शुद्रांच्या व्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करण्यात आलेली दिसून येते.

प्राचीन काळात जन्मावर आधारित व्यवसायाशी निगडीत अशी वर्णव्यवस्था पार्शिया, रोम, जपान इत्यादी देशात होती. जुन्या ग्रीक ग्रंथात अवेस्ता व पार्शी ग्रंथात चार वर्णांचा उल्लेख दिसतो. भारतीय वर्णव्यवस्था ही धर्माशी संबंधित होती. त्यामुळे इतर देशात ही व्यवस्था टिकली नाही किंवा नष्ट झाली. परंतु भारतात मात्र वर्णव्यवस्थेची बैठक दीर्घकाळ टिकून राहीली. चातुवर्ण्यपद्धती भारतात निरनिराळ्या काळात उत्क्रांत होत गेली.

## निष्कर्ष :-

त्रैवर्णिकांची सेवा कोणताही आकस न ठेवता करणे हे शुद्रांचे कार्य मानले होते. त्यांना कोणतेही संस्कार करण्याचा अधिकार नव्हता. नंतरच्या काळात चातुवर्ण्यपद्धतीत कर्माऐवजी जन्माला महत्त्व मिळत गेले व उच्चनिचतेच्या विचारांना महत्त्व प्राप्त झाले. त्यामुळे चातुवर्ण्यपद्धती समाज विभाजनाला घातक ठरली.

## संदर्भ सूची :-


१. Ambedkar, B. R.; Mr. Gandhi and Emancipation of the Untouchables, Thackor & Co. Bombay, १९४३.
२. अग्रवाल, आर. सी., भारतीय संविधान का विकास तथा राष्ट्रीय आंदोलन का इतिहास और भारतीय संविधान, एस. चंद एण्ड कंपनी, लि. नई दिल्ली. १९९८.
३. संविधान सभा के वादविवाद, लोकसभा सचिवालय, खंड-१ ते १०, दिल्ली, १९४६.
४. काचोळे, दा. धो., फुले-आंबेडकर, संवेदन प्रकाशन, औरंगाबाद, २०००
५. भोळे, भा. ल., आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, २००३.